# डॉ. एस. आर. रंगनाथन :

## एक वैश्विक ग्रंथपाल




-संपादक-

डॉ. राहुल कल्याणराव देशमुख

डॉ. विलास अशोकराव काळे


Scanned with Oken Scanner



**डॉ. राहुल कल्याणराव देशमुख** (एम. ए., एम. लिब आणि आय. सी., एम. फिल (मराठी, ग्रंथालय), बी. एड., पीजीडीएलएन, पीएच. डी. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र), ९ वर्षांपासून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यावसायिक अनुभव. २०१९ पासून परंडा येथील शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत. ८ ग्रंथ प्रकाशित, २ संपादकीय ग्रंथ, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषद व चर्चासत्रांत २९ शोधनिबंधांचे सादरीकरण, ३२ शोधनिबंध विविध जर्नलमध्ये प्रकाशित, ५ वर्तमानपत्रांत लेख, २८ कार्यशाळा/परिसंवादात सहभाग, २ राष्ट्रीय ग्रंथालय संघटनांचे आजीव सदस्य, ५ राष्ट्रीय ग्रंथालय संघटनांचे राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त.

●●●



**डॉ. विलास अशोकराव काळे** (एम. ए., एम. लिब आणि आय. सी., पीएच. डी. (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र), ९ वर्षांपासून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यावसायिक अनुभव. २०१४ पासून पूर्णा येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत. २ ग्रंथ प्रकाशित, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषद व चर्चासत्रांत तसेच विविध नियतकालिकांत १८ शोधनिबंध प्रकाशित, २०१८-२०१९ राष्ट्रीय पातळीवर ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त. विविध सामाजिक क्षेत्रात सहभाग, एरंडेश्वर (ता. पूर्णा, जि. परभणी) येथील ओंकारेश्वर सार्वजानिक वाचनालयाचे अध्यक्ष, परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य, औरंगाबाद येथील मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे सभासद, भारतीय ग्रंथालय संघाचे आजीव सदस्य.

●●●


आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...

- amazon.com
- Kopykitab.com
- Bookganga.com
- atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com



ISBN 978-93-90288-15-1

₹ - 225/-

9789390288151

733

## 'गुगल स्कॉलर'मध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या वाचनसाहित्याचा सहभाग

**डॉ. राहुल के. देशमुख**
ग्रंथपाल,
शि. म. गु. रं. गे. शिंदे महाविद्यालय, परंडा,
जि. उस्मानाबाद

**सार :**

आधुनिक भारतातील ग्रंथालयांच्या विकासात डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा फार मोठा वाटा आहे. देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची कवाडं विनामूल्य खुली करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. रंगनाथन यांनीच रुजविला. आपल्या वाचनसाहित्यांचा प्रचार-प्रसार होण्यासाठी अनेक ऑनलाइन माध्यमांचा वापर केला जातो. नंतर तो जोपासण्यासाठीही आपले संपूर्ण आयुष्य झिजविले. यात 'गुगल स्कॉलर' या वाचनसाहित्य शोध इंजिनचा अभ्यास करणारे आहेत. तसेच या शोध इंजिन वाचनसाहित्यात डॉ. रंगनाथन यांच्या वाचनसाहित्यांचा 'गुगल स्कॉलर'मधील योगदानांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

डॉ. रंगनाथन यांनी मांडलेले पाच सिद्धांत हे भारतीय ग्रंथालयशास्त्राचा पाया समजले जातात. डॉ. रंगनाथन यांचा वाढदिवस भारतात 'ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा केला जातो. सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी शालेय शिक्षणासोबतच निरंतर शिक्षणदेखील किती आवश्यक असते, याचे महत्त्व डॉ. रंगनाथन यांनी सर्वप्रथम पटवून दिले. त्याकरिता ग्रंथालयांचा विकास, प्रसार होऊन देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची कवाडं विनामूल्य खुली करून द्यायला हवीत. यासोबत वाचनसंस्कृतीसाठी जनतेला प्रवृत्त केले पाहिजे, हा विचार डॉ. रंगनाथन यांनीच सर्वप्रथम देशात रुजविला. 'गुगल स्कॉलर'मध्ये डॉ. रंगनाथन यांच्या 'वाचनसाहित्य योगदान' या शोधनिबंधात खालील बाबी स्पष्ट करता येतील.

**गुगल स्कॉलर :**

गुगल स्कॉलर हे एक मुक्तपणे प्रवेश करण्यायोग्य वेब शोध इंजिन आहे. जे प्रकाशन स्वरूप आणि अभ्यासपूर्ण साहित्याचा संपूर्ण मजकूर किंवा मेटा डेटा अनुक्रमित करते. २० नोव्हेंबर २००४ रोजी सुरू झालेल्या बिटामध्ये रिलीज

झाले. १ वर्षीपूर्वी, गुगल स्कॉलर इंडेक्समध्ये ऑनलाइन शैक्षणिक जर्नल्स आणि पुस्तके, कॉन्फरन्स पेपर्स, शोधनिबंध आणि प्रबंध, प्री-प्रिंट्स, ॲब्स्ट्रॅक्ट्स, तांत्रिक अहवाल आणि न्यायालयीन मते आणि पेटंट्सह इतर अभ्यासपूर्ण साहित्य समाविष्ट आहे. 'गुगल स्कॉलर'च्या डेटाबेसचा आकार गुगल प्रकाशित करीत नसला, तरी सायंटोमेट्रिक पद्धतीने अनेक संशोधकांनी संशोधित केलेले साहित्य यात समाविष्ट केले आहेत. जानेवारी २००१ मध्ये जगातील सर्वांत मोठे शैक्षणिक सर्च इंजिन बनविणारे अंदाजे ३८९ मिलियनपेक्षा अधिक दस्तावेज; यात लेख, उद्धरण आणि पेटंट्सह असल्याचा अंदाज लावला. गुगल स्कॉलर अलेक्स वर्स्टाक यांच्यातील चर्चेतून उद्‌भवला आणि अनुराग आचार्य, हे दोघेही त्या वेळी गुगलचे मुख्य वेब इंडेक्स तयार करण्याचे काम करीत होते.

**गुगल स्कोलर उद्धरण (Citation)**

संदर्भ नमूद करण्यासाठी इंग्रजी भाषेत (Citation) हा शब्द वापरला जातो. त्यास मराठी पारभाषिक शब्दकोशात 'उद्धरण', उल्लेख निर्देश', 'अवतरण', 'वाक्‌संहिता', 'प्रावाहन' हे शब्द सुचविले गेले आहेत. विद्यवत्तापूर्ण लेखनामध्ये चर्चा केलेल्या विषयांबद्दलचा परिच्छेद अथवा ओळी पुढे इतर पूर्वासुरींच्या मांडणीचा वाङ्‌मयसूचीनुसार सुसंबद्ध निर्देश उधृत केला जातो. यास 'उद्धरणे' म्हणतात. उद्धरणांमध्ये प्रकाशित अथवा अप्रकाशित स्रोतांचा संदर्भ नमूद केला जाऊ शकतो. उद्धरणे ही मूळ स्रोतातूनच नमूद केली जातात, असे नाही. सर्वसाधारणपणे संदर्भार्थ उद्धरणे नमूद करावयाचा परिच्छेद अथवा ओळी नंतर लगेचच संक्षिप्त वर्णसंख्येनुसार अनुक्रमांक अंतर्भूत केला जातो आणि लेखपान, लेख अथवा ग्रंथाच्या शेवटी या अनुक्रमांकापुढे संबंधित संदर्भ कोणत्या लेख, ग्रंथ, व्याख्यान, बातमी, दस्तावजातून घेतला गेला, हे नमूद केले जाते. सर्वसाधारणपणे परिच्छेदांतर्गत नमूद अनुक्रमित संदर्भ उद्धरणे आणि लेख/निबंध/ग्रंथाच्या शेवटी नमूद संदर्भग्रंथ सूची मिळून लेख/ग्रंथाची संपूर्ण वाङ्‌मय सूची बनते. पूर्वासुरींच्या कल्पना आणि लेखनाचे श्रेय संदर्भ नेमच्या स्रोत ग्रंथ अथवा दस्तावजांच्या नामनिर्देशासह नमूद करणे, लेखकाची वैचारिक मांडणी आणि दिलेले संदर्भ लेखनात केलेल्या दाव्यांनुसार, दिलेल्या स्रोतांशी जुळतात का, ते स्वतंत्रपणे पडताळण्याची वाचकांसाठी सोय करून, वाचकास लेखकाने वापरलेल्या स्रोतांची योग्यता आणि क्षमता तपासण्यास साहाय्यभूत ठरावे. लेखनाची एकात्मता आणि बौद्धिक प्रमाणिता जोपासली जावी, श्रेय न देता होणारी उचलेगिरी टाळली जावी, अशा प्रकारची महत्त्वपूर्ण उद्धरणांच्या माध्यमातून साधली जातात.

**h-Index**

एच-इंडेक्स एक लेखक-स्तरीय मेट्रिक आहे. जो वैज्ञानिक किंवा



Scanned with Oken Scanner

विद्यावानांच्या प्रकाशनांचा शोध लेख उत्पादकात आणि उद्धरण परिणाम या दोन्ही गोष्टी मोजण्याचा प्रयत्न करतो. निर्देशांक वैज्ञानिकांच्या सर्वात उद्धृत कागदपत्रांच्या संचावर आणि इतर प्रकाशनांमध्ये त्यांना प्राप्त झालेल्या उद्धरणांच्या संख्येवर आधारित आहे. एखादी विद्यवान जर्नलच्या उत्पादनक्षमतेवर आणि परिणामावर, तसेच विभाग किंवा देश यांसारख्या वैज्ञानिकांच्या गटासंदर्भात निर्देशांक लागू केला जाऊ शकतो. निर्देशांक २००५ मध्ये यू. सी. सॅन दिएगो येथील भौतिकशास्त्र जॉर्ज इ. हर्ष यांनी सुचविले होते की, सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञांची सापेक्ष गुणवत्ता निश्चित करण्यासाठी एक साधन आणि कधी-कधी त्याला हर्ष इंडेक्स किंवा हर्ष क्रमांक असे म्हणतात.

**i10-index :**

'गुगल स्कॉलर'द्वारे तयार केलेले आणि गुगलच्या माझे उद्धरण वैशिष्ट्यामध्ये वापरलेले आहे. i10-index किमान १० उद्धरणे असलेल्या प्रकाशनांची संख्या हा अगदी सोपा उपाय केवळ 'गुगल स्कॉलर'द्वारे वापरला जातो आणि अभ्यासकाची उत्पादकता मोजण्यात मदत करण्याचा आणखी एक मार्ग आहे. i10-index फायदा आहे की, मोजण्यासाठी अगदी सोपे आणि सरळ आणि 'गुगल स्कॉलर'मधील माझे उद्धरण विनामूल्य आणि वापरण्यास सुलभ आहेत.

**डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे कार्य :**

ग्रंथालयशास्त्रांच्या शास्त्रशुद्ध पद्धतीचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांचा जन्म ९ ऑगस्ट १८९२ रोजी मद्रास प्रांतातील तंजावर जिल्ह्यातील शियाली या खेडेगावात झाला. ४ जानेवारी १९२४ रोजी मद्रास विद्यापीठाचे पहिले ग्रंथपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली. या काळात ग्रंथालयांची स्थिती खूपच वाईट होती. ग्रंथालयांना आणि ग्रंथपालाला फारशी प्रतिष्ठा नव्हती. डॉ. रंगनाथन यांनी तयार केलेली द्विबिंदू वर्गीकरण ही ग्रंथांच्या वर्गीकरणाची जगातील अत्यंत महत्त्वाची पद्धती आहे. विविध प्रश्नमालिकांतून डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालयशास्त्राचे पाच सिद्धांत मांडले. त्यांनी १९३३ मध्ये भारतीय ग्रंथालय संघाची स्थापना केली. १९४८ मध्ये मद्रास येथे ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला तो केवळ डॉ. रंगनाथन यांच्या प्रयत्नांमुळेच होय. १९२५ ते १९४५ या कालावधीत ते मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल होते. १९४५ मध्ये ते एस. राधाकृष्णन यांच्या निमंत्रणावरून बनारस हिंदू विद्यापीठात रुजू झाले. १९४६ मध्येही ते तेथे होते. १९४७ मध्ये दिल्ली विद्यापीठाचे सर मॉरिस ग्वायर यांनी ग्रंथालयशास्त्राचे प्राध्यापक व ग्रंथपाल सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती केली. १९६२ पासून ते बंगळुरूच्या डॉक्युमेशन टीचर्स ॲण्ड ट्रेनिंग या संस्थेचे अखेरपर्यंत सन्माननीय प्राध्यापक होते. १९३५ मध्ये त्यांना 'रावसाहेब' उपाधी बहाल करण्यात आली. १९४८

मध्ये दिल्ली विद्यापीठाने त्यांना डी. लिट दिली. भारत सरकारने १९५७ मध्ये 'पद्मश्री' बहाल केली. अमेरिकेतील पीट्सबर्ग विद्यापीठाने १९६४ मध्ये त्यांना डी. लिट बहाल केली. १९७० मध्ये त्यांना 'मार्गारेट मॅन' हे बहुमानाचे पदक मिळाले. या आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभलेल्या आणि ग्रंथालयशास्त्रामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या या महान व्यक्तीचा मृत्यू २७ सप्टेंबर १९७२ रोजी बंगळुरूमध्ये झाला. आजचे ग्रंथालयशास्त्र हे त्यांच्याच संशोधनकार्यात भरारी घेत आहे.

**'गुगल स्कॉलर'मध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे वाचनसाहित्य :**

डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी आपल्या जीवनकार्यात ग्रंथालय आणि माहितीशास्त्राबाबत विविध शोधनिबंध व पुस्तकांतून विचार मांडला आहे. 'गुगल स्कॉलर'च्या वेब पेजवर डॉ. एस. आर रंगनाथन यांनी लिखाण केलेल्या वाचनसाहित्यांचे अनुक्रमे स्पष्टीकरण दर्शविले आहे.

**अ. गुगल स्कॉलरमधील सूची** – गुगल स्कॉलरमध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांची डिसेंबर २०१९ पर्यंतच्या यादीमध्ये ३३३ विविध वाचनसाहित्यांचा समावेश करण्यात आला आहे. १९३२ पासून वाचनसाहित्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**ब. उद्धरण** – गुगल स्कॉलरमध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या एकूण वाचनसाहित्याला डिसेंबर २०१९ पर्यंत एकूण ५३२० उद्धरण citation मिळाले आहेत. h-index -25 व i10-index -55 प्राप्त झाले आहे.

**क. टॉप २० citation**– गुगल स्कॉल वाचनसाहित्यामध्ये पहिल्या सर्वाधिक वीस उद्धरण खालील तक्त्यामध्ये स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ०१

| TITLE | CITED BY | YEAR |
|---|---|---|
| The five laws of library science | 1088 | 1931 |
| Prolegomena To Library Classification | 1026 | 1967 |
| Colon classification | 531 | 1939 |
| Elements of library classification: based on lectures delivered at the University of Bombay in December 1944 | 243 | 1945 |
| Colon Classification | 160 | 2008 |
| Reference service | 140 | 1961 |
| As cinco leis da biblioteconomia | 136 | 2009 |
| Philosophy of library classification | 115 | 1989 |
| Library administration | 113 | 1959 |
| Documentation and Its Facets: Being a Symposium of 70 Papers by 32 Authors. Edited by SR Ranganathan | 82 | 1963 |
| Ramanujan, the man and the mathematician | 75 | 1967 |
| Classification and communication | 69 | 1951 |
| Librametry and its scope | 64 | 1969 |
| A descriptive account of the colon classification | 53 | 1990 |
| Library book selection | 47 | 1966 |
| Heading and canons; comparative study of five catalogue codes. | 46 | 1955 |
| Hidden roots of classification | 43 | 1967 |
| Development and potential of jute geotextiles | 37 | 1994 |
| Subject heading and facet analysis | 34 | 1964 |
| Library manual | 34 | 1951 |
| Library development plan : thirty-year programmer for India with draft library bills for the Union and the constituent states | 34 | 1950 |
| Reference service and bibliography. With a foreword by Sir Maurice Linford Gwyer | 33 | 1940 |



Scanned with Oken Scanner

वरील तक्त्यामध्ये असे स्पष्ट होते की, डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या वाचनसाहित्याचा समावेश 'गुगल स्कॉलर'मध्ये करण्यात आला. The Fi Laws of Library Science त्यांच्या लेखात डिसेंबर २०१९ पर्यंत २० उद्धरणे मिळाली आहेत.

**ड. कालक्रमानुसार वाचनसाहित्य :** 'गुगल स्कॉलर'मध्ये डॉ. ए आर. रंगनाथन यांच्या वाचनसाहित्यास मिळालेल्या उद्धरणांनुसार कालक्रमानु खालील आलेख तयार करण्यात आला आहे.

आलेख क्रमांक ०१




वरील आलेखात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या वाचनसाहित्या मिळालेल्या उद्धरणांचा कालक्रमानुसार मांडणी करण्यात आली आहे. या १९८२ मध्ये ३७ उद्धरणे मिळाली आहेत, ते २०१९ मध्ये १७७ उद्धरणे त्यांच्या लेखास प्राप्त झाली आहेत.

**सारांश :**

'गुगल स्कॉलर'मध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन वाचनसाहित्य असून, या ३३३ वाचनसाहित्यांचा समावेश करण्यात आला आहे. The five laws of library science या वाचनसाहित्याचा संदर्भ म्हणून सर्वाधिक वापर करण्यात आला आहे. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या वाचनसाहित्याचा ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या वाचकांना, संशोधकांना त्यांच्या वाचनसाहित्यांचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

- https://scholar.google.com/citations?hl=en&user=
- https://www.isibang.ac.in/~library/portal/
- https://mr.wikipedia.org

◆◆◆◆◆